ePaper
आता मंत्रिपदे, खात्यांवर खल; शिवसेनेला 10, तर 'राष्ट्रवादी'ला सात कॅबिनेट मंत्रिपदे?

वर्ष - 8 । अंक -149 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 07 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- 'त्या' कृतीमुळे सिराज संतापला!
- बुमराहच्या भेदक गोलंदाजीची कमाल
- माझा पाय चार ठिकाणी मोडला होता
- राष्ट्रवादीला किती मंत्रिपदं मिळणार


### मनपा निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीत बिघाडी

# शपथविधीनंतर वारं फिरलं!

## 'तुतारी'वर निवडणूक लढलेले माजी मंत्री 'घड्याळ' बांधणार, शरद पवारांना मोठ्ठा धक्का

।मुंबई ।महाईन्यूज

**जळगाव जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते गुलाबराव देवकर हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. त्यासाठी त्यांनी नुकतीच प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची भेट घेतली आहे. प्रवेशाच्या चर्चेला खुद्द गुलाबराव देवकर यांनीही दुजोरा दिला आहे.**



जळगाव ग्रमीण मतदारसंघातून देवकरांनी शरद पवारांच्या पक्षाकडून विधानसभा निवडणूक लढवली होती, परंतु त्यांना पराजयाचा झटका बसला. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर शरद पवार गटासाठी हा जळगाव जिल्ह्यातून आणखी एक मोठा धक्का मानला जात आहे.

### गुलाबराव विरुद्ध गुलाबराव लढतीत पराभव

जळगाव जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीने सर्वच्या सर्व अकरा जागांवर विजय मिळवला. त्यामुळे महाविकास आघाडीला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. माजी मंत्री गुलाबराव देवकर यांनी जळगाव ग्रमीण मतदारसंघातून शरद पवार गटाकडून शिंदे गटाचे उमेदवार गुलाबराव पाटील यांच्याविरोधात निवडणूक लढवली. त्यात त्यांचा पराभव झाला.

### तटकरेंसोबत सकारात्मक भेट

आता देवकर अजित पवार गटाच्या वाटेवर आहेत. देवकर यांनी गुरुवारी मुंबईत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची भेट घेतली. तसेच या भेटीदरम्यान देवकर यांनी अजित पवार गटात प्रवेश घेण्याची तयारी दर्शवली. यासह तटकरे यांनीही देवकरांच्या प्रवेशाबाबत सकारात्मकता दर्शविली आहे.

### महापालिकेसाठी ताकद वाढली

जळगाव जिल्ह्यात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे एकमेव आमदार असलेले अनिल पाटील हेच नेते आहेत. आता गुलाबराव देवकरांनी अजित पवार गटात प्रवेश केल्यास त्या माध्यमातून एक मोठा नेता त्यांना मिळणार आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी फायदा होणार आहे.

दरम्यान, राजकारणातील 'जम्पिंग जॅक' अशी ख्याती असलेले शरद पवार गटाचे भिवंडीचे खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांनीही देवेंद्र फडणवीस यांची शपथविधीच्या आधी भेट घेतली होती. महायुतीतील घटकपक्षांचे आमदार आणि खासदार देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीगाठी घेत असताना अचानक महाविकास आघाडीचा नेता भेटल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती, परंतु बाळ्यामामांनी भेटीमागील राजकीय शक्यता धुडकावून लावल्या चर्चांचा धुरळा खाली बसला.

### मुंबई मनपा निवडणुकीआधी आघाडीत बिघाडी

विधानसभा निवडणुकीतील अपयश पचवून शिवसेनेने (ठाकरे) आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. त्यानुसार उद्धव ठाकरे यांनी 'हिंदुत्वा'चा नारा दिला आहे. हिंदुत्वासाठी शिवसेना आधीही लढत होती, उद्याही लढेल आणि पुढेही लढत राहणार. शिवसेना हिंदुत्वापासून दुरावल्याचा अपप्रचार खोडून काढा, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या (ठाकरे) बैठकीत नेते, पदाधिकारी व माजी नगरसेवकांना दिले. शिवसेना नेत्यांनी त्यानुसार कामाला सुरुवातही केली आहे. मात्र, यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेचा नवा मित्र नाराज झाला आहे. या हिंदुत्वाच्या मुद्द्यामुळे आघाडीत बिघाडी झाल्याची देखील चर्चा आहे. तर काहीजण दावा करू लागले आहेत की मुंबई मनपा निवडणुकीआधी आघाडीत बिघाडी होऊ शकते.

---

### तरुणांच्या मृत्यूप्रकरणी बंगला, बोट मालकांवर गुन्हा दाखल

## पवनानगर बोट दुर्घटना, लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद

।लोणावळा।
प्रतिनिधी : महाईन्यूज

मावळ तालुक्यातील पवना धरणात बुधवारी सायंकाळी पाण्यामध्ये बोट उलटून दोन जण बुडून मृत्यूमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली होती. या प्रकरणी बंगला मालक आणि बोट मालकवर निष्काळजीपणाचा ठपका ठेवत गुन्हा दाखल करण्यात आला



आहे. या दुर्घटनेत मयत झालेला तुषार अहिरे याच्या नातेवाईकांनी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात या प्रकरणी फिर्याद दिली असल्याची माहिती लोणावळा ग्रामीणचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ यांनी दिली.

मूळचे भुसावळ येथील असलेले तुषार अहिरे आणि मयूर भारसाके हे मित्रांसोबत मावळ तालुक्यातील पवना धरण परिसरामध्ये चार डिसेंबर रोजी फिरायला आले होते. पवना धरणाच्या बॅकवॉटर परिसरात असलेल्या लेक इस्केप व्हिला या बंगल्यात ते थांबले होते. सदरचा बंगला हा पवना जलाशयाच्या बॅक वॉटर ला लागूनच आहे. तेथूनच थेट धरणामध्ये उतरण्यासाठी रस्ता आहे.,जलाशयामध्ये सुमती व्हिवा यांची एक बोट देखील होती. तुषार अहिरे, मयूर भारसाके त्यांचा एक मित्र बोट घेऊन पाण्यामध्ये गेले होते. बोट पलटी उलटून तुषार आणि मयूर हे पाण्यात पडले. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने त्या दोघांचा देखील पाण्यात बुडून दुर्दैवी असे मृत्यू झाला होता. नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ यांनी सांगितले.

# बचाव मोहिमांमधून 419 कासवांना जीवदान

## वन विभागाच्या वन्यजीव उपचार केंद्रामध्ये उपचार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बेकायदेशीर खरेदी-विक्री, तस्करी आणि वेगवेगळ्या कारणाने वन विभागाने ताब्यात घेतलेल्या ४१९ कासवांना वेळीच मिळालेल्या उपचारांमुळे जीवदान मिळाले आहे. ठाणे, नाशिक, सोलापूरसह विविध जिल्ह्यातील कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेल्या कासवांवर सध्या पुण्यातील वन विभागाच्या वन्यजीव उपचार केंद्रामध्ये उपचार करण्यात येत आहेत.**



### वन्यजीव उपचार केंद्रात आणले

निसर्गात सोडण्याच्या दृष्टीने शारीरिकरित्या ती सक्षम झाल्यानंतर आम्ही अनुकूल अधिवासाची निवड करून त्यांचे पुनर्वसन करणार आहोत.'कासव पुनर्वसन उपक्रमाचा पहिला महिना पूर्ण झाला आहे. दाखल झालेल्या कासवांपैकी अनेकांना पूर्वी दीर्घकाळ बंदिस्त जागेत ठेवले होते. काहींना पुरेसा आहार मिळाला नसल्याने तब्येत नाजूक होती. काहींना हाडाचे आजार तर काहींची परिस्थिती संसर्गजन्य आजारामुळे गंभीर होती. उपचार केंद्रात दाखल झाल्यानंतर आम्ही त्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून उपचारांची दिशा निश्चित केली.

वन विभाग आणि रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टने या उपक्रमाचे 'प्रकल्प कासव पुनर्वसन' असे नामकरण केले आहे. पहिल्याच महिन्यात कासवांच्या तब्येतीमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. पुढील काही महिन्यातच त्यांना पुन्हा निसर्गात सोडण्यात येणार आहे. राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, पुणे वन विभागाचे उपवनसंरक्षक तुषार चव्हाण यांचा सहभागातून कासवांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.प्रकल्पाबद्दल खांडेकर म्हणाले, 'अवैध व्यापार आणि तस्करीतून सुटका केल्यानंतर वन्यप्राणी वन विभागाच्या ताब्यात येतात. त्यांची काळजी घेऊन निसर्गातील पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे, ही वन विभागाची जबाबदारी आहे. याच उद्देशातून कासवांच्या पुनर्वसनाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. गेल्या काही महिन्यांत वेगवेगळ्या कारवायांमध्ये आमच्याकडे चारशेहून अधिक कासवं ताब्यात आली होती. त्यांची एकत्रित काळजी घेणे गरजेचे होते. त्यामुळे या कासवांना पुण्यातील वन्यजीव उपचार केंद्रात आणले." चव्हाण म्हणाले, 'रेस्क्यूचे वैद्यकीय पथक या कासवांची काळजी घेत आहे. केंद्रात दाखल झालेल्या प्रत्येक कासवाची बारकाईने नोंद ठेवण्यापासून निसर्गात त्यांच्या पुनर्वसनापर्यंतची सविस्तर माहिती संग्रहीत करण्यात येत आहे. निसर्गात सोडण्याच्या दृष्टीने शारीरिकरित्या ती सक्षम झाल्यानंतर आम्ही अनुकूल अधिवासाची निवड करून त्यांचे पुनर्वसन करणार आहोत.'कासव पुनर्वसन उपक्रमाचा पहिला महिना पूर्ण झाला आहे. दाखल झालेल्या कासवांपैकी अनेकांना पूर्वी दीर्घकाळ बंदिस्त जागेत ठेवले होते. काहींना पुरेसा आहार मिळाला नसल्याने तब्येत नाजूक होती. काहींना हाडाचे आजार तर काहींची परिस्थिती संसर्गजन्य आजारामुळे गंभीर होती. उपचार केंद्रात दाखल झाल्यानंतर आम्ही त्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून उपचारांची दिशा निश्चित केली. आजारांनुसार त्यांचे वर्गीकरण करण्यात आले. औषधे देण्यात आली. त्यांच्या हालचालींवर नियमित लक्ष ठेवले. बहुतांश कासवांनी पहिल्या टप्प्यातच चांगला प्रतिसाद दिल्याने, तब्येतीत लक्षणीय सुधारणा दिसून आल्या.

वन विभाग आणि रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टने या उपक्रमाचे 'प्रकल्प कासव पुनर्वसन' असे नामकरण केले आहे. पहिल्याच महिन्यात कासवांच्या तब्येतीमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. पुढील काही महिन्यातच त्यांना पुन्हा निसर्गात सोडण्यात येणार आहे. राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, पुणे वन विभागाचे उपवनसंरक्षक तुषार चव्हाण यांचा सहभागातून कासवांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.प्रकल्पाबद्दल खांडेकर म्हणाले, 'अवैध व्यापार आणि तस्करीतून सुटका केल्यानंतर वन्यप्राणी वन विभागाच्या ताब्यात येतात. त्यांची काळजी घेऊन निसर्गातील पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे, ही वन विभागाची जबाबदारी आहे. याच उद्देशातून कासवांच्या पुनर्वसनाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. गेल्या काही महिन्यांत वेगवेगळ्या कारवायांमध्ये आमच्याकडे चारशेहून अधिक कासवं ताब्यात आली होती. त्यांची एकत्रित काळजी घेणे गरजेचे होते. त्यामुळे या कासवांना पुण्यातील वन्यजीव उपचार केंद्रात आणले." चव्हाण म्हणाले, 'रेस्क्यूचे वैद्यकीय पथक या कासवांची काळजी घेत आहे. केंद्रात दाखल झालेल्या प्रत्येक कासवाची बारकाईने नोंद ठेवण्यापासून निसर्गात त्यांच्या पुनर्वसनापर्यंतची सविस्तर माहिती संग्रहीत करण्यात येत आहे.

# क्वांटम तंत्रज्ञानासाठी नवउद्यमींना केंद्र सरकारचे बळ

## फिजिकल सिस्टिम्समध्ये देशभरातील आठ स्टार्टअप्सची निवड

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या नॅशनल क्वांटम मिशन आणि नॅशनल मिशन ऑन इंटरडिसिप्लिनरी सायबर फिजिकल सिस्टिम्समध्ये देशभरातील आठ स्टार्टअप्सची निवड करण्यात आली आहे.**

त्यात आयआयटी मुंबईतील एक आणि पुण्यातील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेतील (आयसर पुणे) एक अशा राज्यातील दोन स्टार्टअप्सचा समावेश आहे.




### आठ स्टार्टअप्सची निवड

अहमदाबादस्थित प्रिस्टिन डायमंड्सतर्फे क्वांटम सेन्सिंगसाठीचे तंत्रज्ञान विकसित करण्यात येणार आहे. दिल्ली येथील क्वानास्त्र ही नवउद्यमी क्रायोजेनिक प्रणाली आणि प्रगत सुपरकंडक्टिंग डिटेक्टर्स तयार करत असून, बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधील क्वान२डी टेक्नॉलॉजीज या नवउद्यमीचे स्वदेशी आणि किफायतशीर सिंगल-फोटॉन डिटेक्टर्स विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे.

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांच्या उपस्थितीत दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात ही निवड जाहीर करण्यात आली. नीती आयोगाचे सदस्य डॉ. व्ही. के. सारस्वत, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव प्रा. अभय करंदीकर, आयसर पुणेचे संचालक प्रा. सुनील भागवत या वेळी उपस्थित होते. नॅशनल क्वांटम मिशन आणि नॅशनल मिशन ऑन इंटरडिसिप्लिनरी सायबर फिजिकल सिस्टिम्ससाठी निवडलेल्या स्टार्टअप्सना क्वांटम तंत्रज्ञान विकसनासाठी केंद्र सरकाकडून सहाय्य करण्यात येणार आहे. त्यासाठी आयसर पुणेतील आय-हब क्वांटम टेक्नॉलॉजी फाउंडेशन, टेक्नॉलॉजी इनोव्हेशन हब यांच्यातर्फे प्रस्ताव मागवून निवड प्रक्रिया राबवण्यात आली. निवड झालेल्या स्टार्टअप्समध्ये बेंगळुरूस्थित क्यूनू लॅब्स ही नवउद्यमी क्वांटम सुरक्षित 'हेटरोजिनियस नेटवर्क' विकसित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. क्यूपिएआय इंडिया ही नवउद्यमी सुपरकंडक्टिंग क्युबिट्स वापरून क्वांटम संगणक विकसित करण्याची योजना आखत आहे.

आयआयटी मुंबईतील डिमिरा टेक्नॉलॉजीज ही नवउद्यमी क्वांटम संगणन आणि इतर क्षेत्रांसाठी स्वदेशी 'क्रायोजेनिक रेडिओफ्रिक्वेन्सी केबल्स' विकसित करणार आहे. आयआयटी दिल्ली येथील प्रेनिशक्यू या नवउद्यमीचा क्वांटम तंत्रज्ञानासाठी उच्च दर्जाची डायोड लेसर प्रणाली विकसित करण्यावर भर आहे. आयसर पुणे येथील क्यूप्रयोग ही नवउद्यमी क्वांटम तंत्रज्ञानासाठी टायटॅनियम सफायर लेसर आणि अति-सुस्पष्ट मोजमापांसाठी ऑप्टिकल फ्रिक्वेन्सी कोम्बची निर्मिती करत आहे.

## पिंपरी-चिंचवडमधील पोलिसांसाठी

# पोलीस आयुक्तांचा हॅपी निर्णय!

### पोलिसांना वाढदिवसाच्या दिवशी आपल्या कुटुंबियांसोबत वेळ घालवता येणार



।पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रभारी अधिकारी आणि कर्मचारी यांच्यात संवाद व्हावा. पोलिसांना वाढदिवसाच्या दिवशी आपल्या कुटुंबियांसोबत वेळ घालवता यावा. मनावरील तणाव कमी व्हावा, यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी प्रत्येक पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्याचा वाढदिवस पोलीस ठाणे, शाखा येथे साजरा करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयाचे शहर पोलीस दलातून स्वागत केले जात आहे.**

प्रभारी अधिकाऱ्यांना पोलीस ठाण्यात, शाखेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा वाढदिवस लक्षात नसतो. कारण त्यांचा प्रत्येक कर्मचाऱ्याशी थेट संबंध येत नाही. त्यामुळे वाढदिवसानिमित्त सुट्टी मागण्यासाठी प्रभारी अधिकाऱ्यांकडे गेल्यानंतर वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला अधिकारी आणि सुट्टी मागणारे कर्मचारी यांच्यात गैरसमज होतात. त्याचा परिणाम दैनंदिन कामावर होतो. या गोष्टी लक्षात घेऊन त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी पोलीस आयुक्त प्रयत्न करीत आहेत.

सततचा बंदोबस्त आणि कामाच्या ताणामुळे पोलिसांना आपल्या कुटुंबाला देखील वेळ देता येत नाही. अति ताणामुळे पोलिसांना आरोग्याच्या विविध समस्या उद्भवतात. अनेक वेळेला पोलिसांना आपले वाढदिवस साजरे करता येत नाहीत. पोलीस आयुक्त चौबे यांनी याची दखल घेतली आहे. प्रभारी अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांचा वाढदिवस लक्षात रहावा तसेच समन्वय राखला जावा यासाठी पोलीस आयुक्तांनी महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.आयुक्तांनी सुरु केलेल्या उपक्रमामुळे पोलिसांना वाढदिवसाच्या दिवशी सुट्टी मिळणार असल्याने त्यांना आपल्या कुटुंबियांना वेळ देता येणार आहे.

तसेच पोलीस ठाण्यात, शाखेत वाढदिवस साजरा होणार असल्याने अधिकारी आणि कर्मचारी यांच्यातील संबंध वृद्धिंगत होतील. या उपक्रमांतर्गत संबंधित पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्याच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला पोलीस स्टेशन, शाखेत केक कापून वाढदिवस साजरा केला जाईल. त्यानंतर प्रभारी अधिकारी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्याला पोलीस आयुक्तांच्या शुभेच्छा संदेशाचे पत्र देतील.

#### महेश लांडगे यांची 'हॅट्रिक' करायची

भोसरी पोलीस ठाण्यात राबवला देशातील सर्वात पहिला उपक्रम भोसरी पोलीस ठाण्यात भोसरीचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधीर अस्पत, सहायक पोलीस आयुक्त सुधीर चौगुले, पोलीस उपायुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी हा उपक्रम राबविला होता. तत्कालीन पोलीस आयुक्त आणि निवृत्त पोलीस महासंचालक मीरा बोरवणकर यांनी सर्वप्रथम देशात भोसरी पोलीस ठाण्यात हा उपक्रम राबविला होता. या उपक्रमाची चर्चा सर्वत्र झाली होती.

पोलीस दैनंदिन काम करत असताना अनेकदा त्यांचा वाढदिवस देखील त्यांच्या लक्षात राहत नाही. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांचा वाढदिवस साजरा करून त्यांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी हा उपक्रम सुरु केला आहे. पोलीस आयुक्तांचा शुभेच्छा संदेश संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्याला दिला जाणार आहे. पोलीस आयुक्त हे शहर पोलीस दलाचे कुटुंब प्रमुख आहेत आणि त्यांचे आपल्याकडे लक्ष आहे, ही भावना या उपक्रमाद्वारे प्रत्येकाच्या मनात निर्माण होणार असल्याचे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी सांगितले.

---

## पिंपरी-चिंचवडकरांना मिळणार हवामान बदलाची माहिती

### निगडी येथील दुर्गादेवी टेकडी येथे अत्याधुनिक एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार मनोरा उभारण्यात येणार



।लोणावळा।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराचे बदलते हवामान, प्रदूषण व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना व त्यांचे परिणाम, आपत्ती व्यवस्थापन करताना राबविल्या जाणाऱ्या उपाययोजना याबाबत माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका आणि भारतीय हवामान विज्ञान विभाग (आयएमडी) यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. हवामान बदलातील विविध आव्हाने सक्षमपणे हाताळण्यासाठी हा करार महत्वपूर्ण ठरणार आहे.**

निगडी येथील दुर्गादेवी टेकडी येथे हवामान बदलाचे संकेत देणारा अत्याधुनिक एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार मनोरा उभारण्यात येणार आहे. याठिकाणी निश्चित केलेल्या जागेची पाहणी महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि पुणे येथील भारतीय हवामान विज्ञान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ के.एस. होसाळीकर यांनी केली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, उद्यान अधीक्षक योगेश वाळूंज तसेच भारतीय हवामान विज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ उदय शेंडे, डॉ. शिजो झकारिया, अश्विन राजू डी.के आदी उपस्थित होते. रडार प्रणाली उभारण्यासाठी महापालिकेद्वारे जागा उपलब्ध करून देण्यात आली असून हवामान विभागामार्फत त्या ठिकाणी रडार उभारण्यात येणार आहे. जागतिक स्तरावरील हवामान झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती येण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. बदलते हवामान आणि त्यामुळे उद्भवणारी आपत्ती यावर संरचनात्मक उपाय योजना करण्यासाठी तसेच शहराच्या शाश्वत विकासासाठी हवामान व वातावरणीय बदलाच्या माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी दोन्ही संस्थामध्ये झालेला सामंजस्य करार भविष्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरणार असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले. या करारानुसार भारतीय हवामान खाते पिंपरी-चिंचवड महापालिकेला वेळोवेळी शहरातील हवामानाचे अंदाज तसेच त्याबाबत करावयाच्या उपाय योजना याबाबत सूचना देणारी माहिती पुरवणार आहे. या माहितीच उपयोग महापालिकेला विविध उपाय योजना आणि नियोजन करण्यासाठी होणार असल्याचे आयुक्त सिंह यावेळी म्हणाले.

#### वातावरणीय घटकांची माहिती महापालिकेला पुरवली जाणार

"एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार" एक अत्याधुनिक स्वदेशी रडार प्रणाली आहे. या प्रणालीचे कार्यपरिक्षेत्र सुमारे १०० किलोमीटर परिघात असणार आहे. यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरासह पुणे जिल्ह्याच्या संपूर्ण क्षेत्राचे, गड परिसर आणि आसपासच्या भागांचे समावेश असणार आहे. आपत्तीजनक हवामान घटनांची वास्तविक-समय निरीक्षण क्षमता, अत्याधिक पाऊस, वादळ, गारपीट, इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी या रडारप्रणालीद्वारे महत्त्वपूर्ण माहिती मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरावर परिणाम करणाऱ्या वातावरणीय घटकांची माहिती महापालिकेला वेळोवेळी पुरवली जाणार असल्याचे के.एस.होसाळीकर यांनी यावेळी सांगितले.



## भूमिका

**सध्या राज्यातील नैसर्गिक व राजकीय वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. नैसर्गिक वातावरण पाहता दिवसेंदिवस थंडीचा कडाका वाढत आहे. काही दिवसांत राज्यात मुसळधारेची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

# राजकीय 'ताप' वाढला?

पावसाने काही राज्यांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात त्याची केव्हाही वर्दी लागू शकते. दुसरीकडे, राज्यात थंडीमुळे सर्वत्र आल्हाददायक वातावरण असताना राजकीय उकाडा जाणवू लागला आहे. राज्याची काळजीवाहू धुरा सांभाळणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना १०५ डिग्री तापाने पछाडले आहे. आता त्यांनी राज्याची काळजी व्हायची की जनतेने त्यांची काळजी व्हायची, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुख्यमंत्र्यांचा हा ताप खराखुरा की राजकीय आहे, हे कळायला मार्ग नाही. त्यातच सरकार स्थापनेचा सोहळा राजकीय पातळीवर मोठ्या प्रमाणात रंगला आहे. राजकीय पातळी एवढ्यासाठी की राज्यात अद्याप सत्ताधारी अथवा विरोधक यांनी राज्यपालांची भेट घेऊन सत्तास्थापनेचा दावा केलेला नाही. ५ डिसेंबरला मुख्यमंत्रिपदाची व काही निवडक आमदारांचा शपथविधी सोहळा रंगणार, अशी अधिकृत माहिती भाजपच्या गोटातून देण्यात आली आहे. मात्र, या शपथविधी सोहळ्याची



माहिती अत्यंत गोपनीय ठेवली जात आहे. एवढेच काय, मुख्यमंत्रिपदी कोण शपथ घेणार हेही अद्याप जाहीर झालेले नाही. राज्यात महायुतीला सत्ता मिळाली असताना अशा प्रकारे छुपाछुपीचे राजकारण सुरू आहे. यामुळे जनतेत मात्र गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्राला विकासाच्या दिशेने नेणारे हे तीन इंजिन सरकार आहे, अशी वलग्ना करणारे आता अविश्वासाच्या गर्तेत सापडले आहेत. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर जी परिस्थिती निर्माण झाली तशीच आता राज्यात आहे. मुख्यमंत्रिपदी कोणाला विराजमान करायचे यावरून महायुतीत गोंधळाचे वातावरण आहे. शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या रेसमधून माघार घेतल्याचे कळते. मात्र, भाजपकडून देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब होताना दिसत नाही. राज्यात भाजपने बहुमत मिळवूनही फडणवीस यांच्याऐवजी शिंदे यांना मुख्यमंत्रिपदासाठी जास्त पसंती मिळताना दिसते. मुख्यमंत्रिपदी पुन्हा शिंदे यांनाच विराजमान करावे, अशी मागणी करणारे बॅनर राज्यासह नाशिकमध्ये झळकू लागले आहेत. विशेष म्हणजे, या बॅनरवर कोणत्याही राजकीय पक्ष अथवा नेत्यांचे फोटो नाहीत किंवा नावही नाही. एकंदरीत मुख्यमंत्रिपदी पुन्हा एकनाथ शिंदेच हवेत, अशी मागणी आता सर्वत्र होऊ लागली आहे आणि त्यात गैर काही नाही. मागील एक टर्म मुख्यमंत्रिपदाची धुरा फडणवीस यांनी सांभाळली आहे. त्यातच पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्याचे रेकॉर्ड त्यांच्या नावावर नोंदवले गेले आहे. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेशी काडीमोड घेत युतीधर्म निभावला आहे. रात्रंदिवस काम करणारे मुख्यमंत्री अशी त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाची संधी देण्यास काही हरकत नाही. सन २०१९ मध्ये राज्यात अशी परिस्थिती निर्माण होऊन जवळपास महिन्यानंतर सरकार स्थापन केले होते. त्यावेळी युती तुटल्याने फडणवीस यांनी अजित पवार यांना सोबत घेत पहाटेचा शपथविधी घडवून आणला. आता मात्र अशी परिस्थिती नाही. शिंदे यांची शिवसेना व अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस भक्कमपणे महायुतीच्या सरकारसोबत आहे. शिवाय जनतेनेही महायुती सरकारला भरभरून मतदान केले आहे. राजकीय पातळीवर फडणवीस यांना मुख्यमंत्री करावे, अशी मोहीम सुरू आहे. जनसामान्य व आमदारांची मागणी पाहता मुख्यमंत्रिपदी पुन्हा शिंदेच त्यांना हवे आहेतवसेंदिवस लांबत असताना दिसते आहे. याचा अर्थ भाजप ऐनवेळी धक्कातंत्राचा वापर करून एखाद्या नवीन चेहऱ्यालाच मुख्यमंत्रिपदाची संधी देणार, हे मागील अनुभवावर दिसते. भाजपने शिंदे यांना मुख्यमंत्रिपदाची संधी नाकारणे म्हणजे एकप्रकारे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखेच आहे. भाजपला राज्यात सत्तांतर घडवून आणण्यासाठी व फडणवीस यांना 'मी पुन्हा येणार' हा शब्द खरा करून दाखवण्यासाठीच त्यांची गरज वाटत होती, अशी नाहक शंका मतदारांच्या मनात निर्माण होऊ लागली आहे.

## प्रासंगिक »

### बाबासाहेब कळले ?


***मराठा , बहुजन या वर्गासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काय केले हे सांगायचे ठरवले.***

भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे बघण्याचा बौद्धेतर समाजाचा दृष्टीकोन अलीकडे म्हणजे गेल्या १५/२० वर्षात बऱ्याच प्रमाणात बदलला असल्याचे लक्षात येते. तरीही हा बदल अपेक्षित असा वाटत नाही. बाबासाहेबाना बहुजन समाजाबद्दल आतून कळवळा होता तो त्यांनी केलेल्या कार्याच्या स्वरूपात विविध क्षेत्रात उमटला सुद्धा आहे मात्र बहुजन समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतक्या वर्षातही स्वीकारता आले नाहीत, त्यांचे थोरपण आणि आपल्यासाठी केलेले कार्य सगळी साधने उपलब्ध असताना सुद्धा पाहता आले नाही हे वास्तव आहे. आपण बहुजन आहोत हेच स्वीकारणे ज्यांना कमीपणाचे वाटते असा बहुजन समाज आणखी किती वर्ष डोळे लावून सामाजिक प्रवास करेल हे आजतरी सांगता येणे कठीण आहे. असाच एका व्याख्यानाला एका गावात गेल्यावर कार्यक्रम संपल्यावर परिचितांच्या घरी चहा घेताना एका पाटलाच्या पोराने विचारलेल्या प्रश्नाने बेजार झालो होतो.

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले आहेत. एका पक्षाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री असलेल्या अरविंद केजरीवाल यांच्यावरील हल्ल्याने दिल्ली सुरक्षित नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा नाही. दिल्लीची सुरक्षा व्यवस्था केंद्र सरकारकडे आहे.

# दिल्ली असुरक्षित का झाली ?

दिल्ली सरकारला याबाबत काहीच करता येत नाही. दिल्लीच्या प्रदूषणाची एकीकडे जगभर चर्चा असताना दुसरीकडे दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेची लक्तरे लाल किल्ल्यावर टांगली आहेत. केजरीवाल यांच्यावर हल्ला अशावेळी झाला आहे, जेव्हा केजरीवाल दिल्लीतील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेवर ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलेही भीतीच्या सावटाखाली आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या गुन्ह्यांची प्रकरणे गंभीर आहेत. दिल्ली याबाबतही आघाडीवर असल्याचे दिसते. २०२१ मध्ये ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित ११६६ गुन्हे घडले होते, तर २०२२ मध्ये ते वाढून १३१५ झाले आहेत. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या मुंबईत ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित ५७२ गुन्हे दाखल झाले आहेत. बेंगळुरूमध्ये ही संख्या ४५८ इतकी कमी आहे. लहान मुलांवरील गुन्ह्यांमध्ये दिल्ली अव्वल आहे. ८६८३ गुन्हे दाखल झाले आहेत, तर मुंबईत ही संख्या ३,१७८ आणि बेंगळुरूमध्ये



१५७८ आहे. २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये राजधानीत सायबर गुन्ह्यांची संख्या दुप्पट झाली आहे. २०२१ मध्ये सायबर गुन्ह्यांची ३४५ प्रकरणे होती, ती २०२२ मध्ये ६८५ पर्यंत वाढली आहे. देशाच्या राजधानीत दररोज पाच दरोडे पडतात. एकीकडे दिल्लीतील वाढत्या गुन्ह्याची चर्चा होत असताना दुसरीकडे दिल्ली पोलिसांवर टीका होत आहे; मात्र त्याचवेळी दिल्ली पोलिसांतील १३ हजार पदे रिक्त आहेत. त्यामुळे दिल्ली पोलिस पूर्ण क्षमतेने काम करत नसल्याची टीका व्यर्थ ठरते. दिल्लीची लोकसंख्या, देशाची राजधानी असल्याने अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचा वावर आणि वाहतूक नियंत्रण आदी बाबी विचारात घेतल्यास दिल्लीसाठी सुमारे ९४ हजार पोलिस कर्मचारी असावेत, असे संख्याशास्त्र सांगते; परंतु अजूनही १३ हजार पदे रिक्त आहेत. २०१४ पासून जेमतेम ५.५ हजार जागा भरल्या गेल्या आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे केंद्र सरकारने दिल्ली पोलिसांच्या बजेटमध्येही कपात केली आहे. २०२४-२५ च्या अंतरिम बजेटमध्ये भाजपने दिल्ली पोलिसांच्या बजेटमध्ये ४.५ टक्के कपात केली. गेल्या वर्षीच्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत ही घट झाली आहे. दिल्ली दंगलीच्या तपासात दिल्ली पोलिसांवर दिल्ली न्यायालयात ताशेरे ओढले होते. ही दंगल २०२० मध्ये झाली होती. अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी पुराव्याशिवाय अहवाल दाखल करून न्यायालयाचा वेळ वाया घालवल्याची टिप्पणी केली होती. दिल्ली दंगलीचा तपास, आरपीओ पत्र आणि पुराव्यांची छेडछाड याप्रकरणी दिल्ली न्यायालयाने एकापेक्षा जास्त वेळा दिल्ली पोलिसांवर ताशेरे ओढले आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राष्ट्रवादीला किती मंत्रिपदं मिळणार

## आता खातेवाटपात कोणाला काय मिळणार याची उत्सुकता!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवारांचा शपथविधी सोहळा काल संपन्न झाला. फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची, तर शिंदे, पवारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. यानंतर आता खातेवाटपात कोणाला काय मिळणार याची उत्सुकता आहे. ११ किंवा १२ डिसेंबरला मंत्रिमंडळाचा विस्तार होऊ शकतो. त्यात भाजप मित्रपक्षांना किती स्थान आणि मान देणार याकडे लक्ष आहे. एकनाथ शिंदेंच्या मंत्रिमंडळात भाजपचे १०, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रत्येकी ९ मंत्री होते. आता नव्या मंत्रिमंडळात भाजपचे २० ते २२ मंत्री असण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेना, राष्ट्रवादीला किती मंत्रिपदं मिळणार याची उत्सुकता आहे.**



मुख्यमंत्रिपदाचा त्याग करणारे एकनाथ शिंदे गृह मंत्रालयासाठी आग्रही आहेत. त्यासाठी शिवसेनेकडून बराच जोर लावला जात आहे. पण या दोन्ही मंत्रालयांवर भाजपची नजर आहे. त्यामुळे दोन्ही विभाग भाजपकडे जाण्याची दाट शक्यता आहे.मुख्यमंत्रिपद आणि उपमुख्यमंत्रिपदाची बदल झालेली आहे. मग आधीच्या उपमुख्यमंत्र्यांकडे असलेली खातीही आताच्या उपमुख्यमंत्र्यांना मिळावीत, अशी शिवसेनेची मागणी आहे. शिंदे मुख्यमंत्री असताना फडणवीस यांच्याकडे गृह मंत्रिपदाचा कार्यभार होता. आता शिंदे यांच्याकडे उपमुख्यमंत्रिपद आल्यानं त्यांना गृहमंत्रिपद दिलं जावं, यासाठी सेना आग्रही आहे. गृह मंत्रालयाची मागणी करताना शिवसेनेकडून युती सरकारच्या काळातील फॉर्म्युल्याची आठवण करुन दिली जात आहे. १९९५ मध्ये राज्यात पहिल्यांदा शिवसेना-भाजप युतीचं सरकार आलं. त्यावेळी सेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले. तर उपमुख्यमंत्रिपद भाजपच्या गोपीनाथ मुंडेंकडे गेलं. मुंडे यांच्याचकडे गृहमंत्रिपद होतं. त्याच युती पॅटर्नचं स्मरण सेनेकडून करुन दिलं जात आहे. आघाडी सरकारच्या काळातही कायम उपमुख्यमंत्री असलेल्या पक्षाच्या नेत्याकडेच गृह विभाग राहिला. काँग्रेसचे विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना राष्ट्रवादीच्या छगन भुजबळांनी गृह विभाग सांभाळला. काँग्रेसचे सुशील कुमार शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर गृहची जबाबदारी राष्ट्रवादीचे आर. आर. पाटील गृहमंत्री होते. काँग्रेसच्या अशोक चव्हाणांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रं हाती घेतल्यावर जयंत पाटील गृह मंत्री झाले. त्यानंतर काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री झाल्यावर राष्ट्रवादीचे आर. आर. पाटील यांच्याकडे गृह मंत्रालयाचा कार्यभार होता. युती, आघाडीच्या काळात कधीच मुख्यमंत्री असलेल्या पक्षाकडे गृह मंत्रालयाचा कार्यभार राहिलेला नाही. पण २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी हा पायंडा मोडला. त्यांनी मुख्यमंत्रिपदासह गृह मंत्रालय स्वत:कडे ठेवलं. पाच वर्षे त्यांच्याकडेच गृह मंत्रालयाची जबाबदारी राहिली. आताही भाजप तोच पॅटर्न राबवण्याच्या तयारीत आहे. तसं झाल्यास भाजप सेनेला जास्त वरचढ ठरेल.

मुख्यमंत्रिपदाचा त्याग करणारे एकनाथ शिंदे गृह मंत्रालयासाठी आग्रही आहेत. गृहसह नगरविकास मंत्रालयदेखील त्यांना हवं आहे. त्यासाठी शिवसेनेकडून बराच जोर लावला जात आहे. पण या दोन्ही मंत्रालयांवर भाजपची नजर आहे.मुख्यमंत्रिपद आणि उपमुख्यमंत्रिपदाची बदल झालेली आहे. मग आधीच्या उपमुख्यमंत्र्यांकडे असलेली खातीही आताच्या उपमुख्यमंत्र्यांना मिळावीत, अशी शिवसेनेची मागणी आहे. शिंदे मुख्यमंत्री असताना फडणवीस यांच्याकडे गृह मंत्रिपदाचा कार्यभार होता. आता शिंदे यांच्याकडे उपमुख्यमंत्रिपद आल्यानं त्यांना गृहमंत्रिपद दिलं जावं, यासाठी सेना आग्रही आहे. गृह मंत्रालयाची मागणी करताना शिवसेनेकडून युती सरकारच्या काळातील फॉर्म्युल्याची आठवण करुन दिली जात आहे. १९९५ मध्ये राज्यात पहिल्यांदा शिवसेना-भाजप युतीचं सरकार आलं. त्यावेळी सेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले.मुंडे यांच्याचकडे गृहमंत्रिपद होतं. त्याच युती पॅटर्नचं स्मरण सेनेकडून करुन दिलं जात आहे. आघाडी सरकारच्या काळातही कायम उपमुख्यमंत्री असलेल्या पक्षाच्या नेत्याकडेच गृह विभाग राहिला. काँग्रेसचे विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना राष्ट्रवादीच्या छगन भुजबळांनी गृह विभाग सांभाळला.

### शिंदे गृह मंत्रालयासाठी आग्रही

काँग्रेसचे सुशील कुमार शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर गृहची जबाबदारी राष्ट्रवादीचे आर. आर. पाटील गृहमंत्री होते. काँग्रेसच्या अशोक चव्हाणांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रं हाती घेतल्यावर जयंत पाटील गृह मंत्री झाले. त्यानंतर काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री झाल्यावर राष्ट्रवादीचे आर. आर. पाटील यांच्याकडे गृह मंत्रालयाचा कार्यभार होता. युती, आघाडीच्या काळात कधीच मुख्यमंत्री असलेल्या पक्षाकडे गृह मंत्रालयाचा कार्यभार राहिलेला नाही. पण २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी हा पायंडा मोडला. त्यांनी मुख्यमंत्रिपदासह गृह मंत्रालय स्वत:कडे ठेवलं. पाच वर्षे त्यांच्याकडेच गृह मंत्रालयाची जबाबदारी राहिली. आताही भाजप तोच पॅटर्न राबवण्याच्या तयारीत आहे. तसं झाल्यास भाजप सेनेला जास्त वरचढ ठरेल.

# सरकारचा विकास प्लॅन तयार!

## पुढच्या काळात चार नदीजोड प्रकल्पांवर भर असणार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले आहेत. यानंतर त्यांनी शुक्रवारी डीडी सह्याद्रीला दिलेल्या मुलाखतीत महायुती सरकारचा पुढील पाच वर्षांचा विकास प्लॅन सांगितला आहे. तसेच जनतेचे आभारही मानले आहेत.**

ते म्हणाले, कालच्या शपथविधीतील जनसमुदाय पाहिला तर खूप आनंद झाला. जे यश जनतेने दिलं आहे, ते सेलिब्रेशन करण्याकरिता नाही. ते यश जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याकरिता दिलं आहे. मला खूप मोठ्या जबाबदारीची जाणीव झाली. तसेच नव्या कार्यकाळात आम्ही प्रकल्पांना वेगाने पुढे नेणार आहोत. यावेळी माझा भर नदीजोड प्रकल्पावर असणार आहे. तर दुसरं म्हणजे ग्रीन एनर्जीवरही भर असणार आहे, असे फडणवीसांनी नमूद केले.

फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र आता थांबणार नाही याचा अर्थ अडीच वर्षापूर्वी आमचं सरकार आलं तेव्हा आम्ही राज्याला ट्रॅकवर आणलं. आता सरकारच्या पुढच्या काळात चार नदीजोड प्रकल्पांवर माझा भर असणार आहे. यामुळं महाराष्ट्र कायम दुष्काळमुक्त होईल. तसेच ग्रीन एनर्जीवर देखील माझा भर राहणार आहे. आपण ५४ हजार मेगावॅटचे वेगवेगळे प्रकल्प हातात घेतले आहेत. २०३० मध्ये ५२ टक्के वीज ग्रीन एनर्जीसारख्या पारंपारिक स्त्रोतातून असणार आहे, असेही फडणवीस म्हणाले. यामुळे शेती आणि उद्योग क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. दोन्ही क्षेत्रांमुळे महाराष्ट्रात रोजगाराची निर्मिती होईल आणि अर्थव्यवस्थेला विशेष चालना मिळेल, वेगवेगळ्या प्रकल्प तर हाती घेऊच पण या दोन गोष्टींवर विशेष भर असेल.



### 375 किमी मेट्रोचं काम सुरु केलं

मी २०१६मध्ये एक घोषणा केली होती. मुंबईच्या एमएमआर रिजनमधील कोणत्याही भागात एक तासात जाता आलं पाहिजे. पण आम्ही त्याच्यापुढे जात आहोत. कोस्टल रोड झाला, वर्सोवा सी-लिंकचंही काम झालं, वर्सोवा-मढचं टेंडर दिलं आहे, त्याचं काम सुरू होत आहे. मढपासून विरारपर्यंत सिलिंक तयार केलं आहे. जपान सरकारने प्रकल्पाला ४० हजार कोटी देण्याचं कबूल केले आहे. त्यामुळे मुंबईत वाहतुकीचा वेळ कमी होणार आहे. ३७५ किलोमीटरचं मेट्रो नेटवर्क करणार आहोत. पाच वर्षात हे ३७५ किमी मेट्रोचं काम सुरू केलं आहे, यामुळे मुंबईकरांच्या वेळेची बचत होईल आणि त्यांना क्वालिटी टाईमही मिळेल, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

# खासदाराच्या जागेवर सापडले नोटांचे बंडल!

## मनू सिंघवी हे 2024-26 साठी तेलंगणातून राज्यसभेचे खासदार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यसभेत प्रचंड गदारोळ बघायला मिळाला. विरोधी पक्षाच्या खासदाराच्या सीटवर नोटांचे बंडल सापडले. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी या विषयाची माहिती सभागृहाला दिली. सभापती जगदीप धनखड म्हणाले की, मला अशी माहिती मिळाली आहे की, काल सभागृहाचे कामकाज तहकूब झाल्यानंतर चलनातील नोटांचे बंडल मिळाले आहे.**



### तुम्ही देशाची बदनामी करत आहेत

माझी विनंती आहे की, जोपर्यंत या प्रकरणाचा तपास सुरू आहे, तोपर्यंत ज्याच्या जागेवर हे नोटांचे बंडल सापडले त्या व्यक्तीचे नाव सांगू नये.खर्गे यांचे हे बोलणे ऐकताच सत्ताधारी गदारोळ करताना दिसले. सत्ताधाऱ्यांचा गदारोळ पाहून खर्गे संतापले आणि म्हणाले की, असे करून तुम्ही देशाची बदनामी करत आहेत. केंद्रीय मंत्री आणि भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा याबद्दल बोलताना म्हणाले की, तुम्ही एखाद्यावर तीव्रता दाखवता आणि एखाद्या मुद्द्यावर चिखलफेक करता, हे योग्य नाही. मला अगोदरच माहिती आहे मी जर दुसऱ्या कोणत्या मुद्द्यावर बोललो तर तुम्ही मला बोलूच देणार नाहीत. माझी विनंती आहे की, जोपर्यंत या प्रकरणाचा तपास सुरू आहे, तोपर्यंत ज्याच्या जागेवर हे नोटांचे बंडल सापडले त्या व्यक्तीचे नाव सांगू नये. खर्गे यांचे हे बोलणे ऐकताच सत्ताधारी गदारोळ करताना दिसले.

त्यांनी सांगितले की, बाक नंबर 222 वर हे नोटांचे बंडल भेटले आहे. हा बाक नंबर काँग्रेस खासदार अभिषेक मनू सिंघवी यांना देण्यात आला आहे. अभिषेक मनू सिंघवी हे 2024-26 साठी तेलंगणातून राज्यसभेचे खासदार आहेत. या मुद्द्यावर बोलण्यासाठी खर्गे उठले असता सभापती जगदीप धनखड यांनी म्हटले की, फक्त नोटांच्या मुद्द्यावरच बोला.

त्यावर खर्गे म्हणाले की, मला अगोदरच माहिती आहे मी जर दुसऱ्या कोणत्या मुद्द्यावर बोललो तर तुम्ही मला बोलूच देणार नाहीत. माझी विनंती आहे की, जोपर्यंत या प्रकरणाचा तपास सुरू आहे, तोपर्यंत ज्याच्या जागेवर हे नोटांचे बंडल सापडले त्या व्यक्तीचे नाव सांगू नये. खर्गे यांचे हे बोलणे ऐकताच सत्ताधारी गदारोळ करताना दिसले. सत्ताधाऱ्यांचा गदारोळ पाहून खर्गे संतापले आणि म्हणाले की, असे करून तुम्ही देशाची बदनामी करत आहे.

केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी ही घटना अत्यंत गंभीर असल्याचे म्हटले आहे. त्यांनी हा सभागृहाच्या प्रतिष्ठेवर हल्ला असल्याचे म्हटले आहे. त्यांनी सभागृहाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी यादरम्यान सिंघवी यांचे नाव देखील घेतले. याबद्दल बोलताना म्हणाले की, तुम्ही एखाद्यावर तीव्रता दाखवता आणि एखाद्या मुद्द्यावर चिखलफेक करता, हे योग्य नाही. जगदीप धनखड यांच्या नोटांचे बंडल सापडल्याच्या खुलाशानंतर सभागृहात जोरदार गोंधळ झाला. या मुद्द्यावरून विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षांमध्ये जोरदार वाद पेटला. काही सदस्यांनी या घटनेच्या चौकशीची मागणी केली तर काहींनी हे एक राजकीय षडयंत्र असल्याचे म्हटले. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड म्हणाले की, मी सदस्यांना सूचित करत आहे की, काल सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर सभागृहाची नियमित तपासणी सुरू होती. सध्या अभिषेक मनू सिंघवी यांना देण्यात आलेल्या जागेवर चलनी नोटांचा गठ्ठा सुरक्षा अधिकाऱ्यांनी जप्त केला आहे. ही बाब लक्षात आणून देण्यात आल्यानंतर मी चौकशीचे आदेश दिले आहेत आणि सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

दरम्यान या संपूर्ण घटनेवर अभिषेक मनु सिंघवी यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे. मी राज्यसभेत जाताना फक्त ५०० ची एक नोट बरोबर ठेवतो. मी या प्रकरणाबद्दल पहिल्यांदाच ऐकतोय. काल मी बरोबर १२ वाजून ५७ मिनिटांनी सभागृहात आलो. सभागृहाचे कामकाज १ वाजता तहकूब झाले. त्यानंतर मी कॅन्टीनमध्ये १ वाजून ३० मिनिटांपर्यंत अयोध्या प्रसाद यांच्याबरोबर बसून होतो आणि नंतर निघून गेलो, असे सिंघवी म्हणाले. राज्यसभेत प्रचंड गदारोळ बघायला मिळाला. विरोधी पक्षाच्या खासदाराच्या सीटवर नोटांचे बंडल सापडले.

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी या विषयाची माहिती सभागृहाला दिली. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे या मुद्द्यावर बोलण्यासाठी उभे राहिले असता सत्ताधारी पक्षातील लोकांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. सत्ताधाऱ्यांनी गोंधळ करण्यास सुरूवात करताच मल्लिकार्जुन खर्गे हे चांगलेच संतापल्याचे बघायला मिळाले. त्यांनी सत्ताधाऱ्यांना खडेबोल सुनावले. सभापती जगदीप धनखड म्हणाले की, मला अशी माहिती मिळाली आहे की, काल सभागृहाचे कामकाज तहकूब झाल्यानंतर चलनातील नोटांचे बंडल मिळाले आहे. या मुद्द्यावर बोलण्यासाठी खर्गे उठले असता सभापती जगदीप धनखड यांनी म्हटले की, फक्त नोटांच्या मुद्द्यावरच बोला. त्यावर खर्गे म्हणाले की, मला अगोदरच माहिती आहे मी जर दुसऱ्या कोणत्या मुद्द्यावर बोललो तर तुम्ही मला बोलूच देणार नाहीत.

---

# माझा पाय चार ठिकाणी मोडला होता

## विरोधीपक्षनेते असताना गडकरींसोबत काय घडलं होतं?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात गेल्या काही वर्षात वाढलेल्या रस्ते अपघातातील मृत्युंमुळे सर्वांचीच चिंता वाढली आहे. अशात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नुकतेच संसदेत सांगितले की, रस्ते अपघातातील मृत्यू कमी करण्यासाठी केंद्र सरकारने खूप प्रयत्न केले आहेत.**



### लोक नियम पाळत नाहीत

सहकार्याशिवाय अपघात कमी करणे शक्य नाही. आम्ही वाहतूक नियम न पाळणाऱ्यांसाठी दंडही वाढवला आहे पण लोक नियम पाळत नाहीत."केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गेल्या आठवड्यात संसदेत दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षी देशात ४.८० लाखांहून अधिक रस्ते अपघात झाले असून, त्यात १.७२ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. २०२२ च्या रस्ते अपघातांच्या आकडेवारीशी तुलना केली असता, अपघातांमध्ये ४.२ टक्क्यांनी आणि मृतांमध्ये २.६ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

तरीही लोकांमध्ये कायद्याचा आदर किंवा भीती नसल्यामुळे रस्ते अपघातातील मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान एका प्रश्नाला उत्तर देताना नितीन गडकरी म्हणाले की, ते स्वतः रस्ता अपघाताला बळी पडले आहेत आणि या विषयाबाबतचे गांभीर्य त्यांना माहित आहे.लोकसभेच्या प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान रस्ते अपघातांविषयीच्या प्रश्नाला उत्तर देताना नितीन गडकरी म्हणाले की, "रस्ते बांधणी, ऑटोमोबाईल इंजीनियरिंग,पण, समाजाची सर्वात मोठी समस्या ही आहे की, लोकांना ना कायद्याचा आदर आहे, ना त्यांना त्याची भीती आहे. लोक सिग्नल पाळत नाहीत, हेल्मेट घालत नाहीत. ३० हजार लोक हेल्मेट न घातल्यामुळे मरतात अशा समस्या आहेत. मी स्वतः अपघाताचा बळी ठरलो आहे, महाराष्ट्रात विरोधी पक्षनेता असताना झालेल्या अपघातात माझा पाय चार ठिकाणी मोडला होता."लोकसभेला रस्ते अपघातांबाबत माहिती देताना नितीन गडकरी पुढे म्हणाले, "खूप प्रयत्न करूनही यावर्षी १.६८ लाख लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला, याची खंत वाटते. रस्त्यांवरील नियमांची काटेकोर अंमलबजावणी न केल्यामुळे या मृत्यूंची संख्या मोठी आहे.

# मला अंडरवर्ल्डमधून धमक्यांचे फोन यायचे : विवेक ओबेरॉय

बॉलीवूडच्या कलाकारांची अनेकदा विविध कारणांमुळे चर्चा होताना दिसते. कधी ते त्यांच्या चित्रपटातील अभिनयामुळे चर्चेत असतात, कधी त्यांच्या आगामी काळातील प्रोजेक्ट्मुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत असतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी शेअर केलेले फोटो, व्हिडीओ चर्चांचा भाग बनतात. तर अनेकदा या कलाकारांनी मुलाखतीत केलेली वक्तव्ये चर्चांचा भाग बनतात. आता बॉलीवूड अभिनेता विवेक ओबेरॉयत्याने नुकत्याच एका मुलाखतीत केलेल्या वक्तव्यांमुळे तो चर्चेत आला आहे.अभिनेता विवेक ओबेरॉयने नुकतीच डॉक्टर जय मदान यांच्या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत अभिनेत्याने म्हटले, "माझ्या करिअरमध्ये मी असा एक संघर्षाचा काळ अनुभवला, ज्यावेळी मला आर्थिक ताण सहन करावा लागला. मी खूप तणावात होतो. मला अंडरवर्ल्डमधून धमक्यांचे फोन यायचे. मी माझ्या आयुष्यात असे कधी अनुभवले



नव्हते. हे सगळे एकत्र घडले."सलमान खानबरोबर त्याने जे भांडण सुरू केले होते, त्यावर बोलताना अभिनेत्याने म्हटले, "तो एक भावनिक प्रतिसाद होता. मी खूप लहान होतो. माझ्या कृत्यांचे परिणाम मला खूप उशिरा समजले. मी केलेल्या गोष्टींच्या परिणामांना सामोरे जाण्यास मी तयार होतो. पण, ज्यावेळी माझ्या आई-वडिलांना धमकावले गेले, त्यावेळी मला त्रास झाला. माझे आई-वडील फोन उचलायचे तेव्हा त्यांना धमकावले जायचे. मला माझ्या बहिणींसाठी भीती वाटत होती. सुरुवातीला आम्ही विचार केला की, हे प्रँक कॉल आहेत. पण, नंतर पोलिसांकडून समजले की, त्या धमक्या खऱ्या होत्या."विवेकला काय धमकी मिळाली होती, याबद्दल त्याने कोणतेही वक्तव्य केले नाही. याबद्दल अधिक बोलताना पुढे त्याने म्हटले, "मी माझ्या रिलेशनशिपच्या कठीण टप्प्यातून गेलो." यावर त्याला विचारले की, जेव्हा तू कठीण काळातून जात होतास, त्यावेळी तुला इंडस्ट्रीने काही मदत केली का?

## प्रेमामुळे करिअर संपलं, देशही सोडावा लागला

'करण अर्जुन' फेम लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री ममता कुलकर्णी अखेर २५ वर्षांनी मुंबईत परतली आहे. ड्रग्ज प्रकरणात नाव आल्यानंतर करिअरवर परिणाम झाला आणि ती जवळपास २५ वर्षे भारताबाहेर राहिली. १२ वर्षांपूर्वी एकदाच ती भारतात येऊ शकली होती, बाकी संपूर्ण काळ तिने भारताबाहेर घालवला. आता मुंबईत परतल्यावर ममता पुन्हा चर्चेत आली आहे. ५२ वर्षीय ममता कुलकर्णीने मुंबईत परतल्यावर एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल मोठा खुलासा केला आहे. ममताने लग्न केलं आहे, असं म्हटलं जात होतं. मात्र ममताने ती सिंगल असल्याचं सांगितलं. भारतात परतल्यावर तिने तिच्या व विकी गोस्वामीच्या नात्यावर भाष्य केलं आहे.सीएनएन न्यूज 18 ला दिलेल्या मुलाखतीत ममताने विकी गोस्वामीसोबतच्या तिच्या नात्याबद्दल खुलासा केला. "मी विकीशी लग्न केलेलं नाही. तो माझा नवरा नाही. मी अविवाहित आहे. मी कोणाशीही लग्न केलेलं नाही. विकी आणि मी रिलेशनशिपमध्ये होतो, पण मी त्याला ४ वर्षांपूर्वी ब्लॉक केलं," असं ममता म्हणाली.ममता पुढे म्हणाली, "विकी चांगला माणूस आहे. त्याचं मन खूप चांगलं आहे. इंडस्ट्रीतील सर्वजण त्यांना भेटायला यायचे, त्यामुळे मीही त्याला भेटायला जायचे. पण त्याला भेटायला गेलेली मी इंडस्ट्रीतील शेवटची व्यक्ती आहे. मला त्याचं सत्य समजल्यावर मी त्याला सोडून दिलं.

## दिशा योद्धा चित्रपटामुळे चर्चेत



अभिनेत्री दिशा पाटनी 'योद्धा'या तिच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. या ॲक्शन चित्रपटाच्या ट्रेलर लाँचचा कार्यक्रम गुरुवारी आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये निर्माता करण जोहर, अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा, अभिनेत्री राशी खन्ना आणि दिशा पाटनी यांच्यासह 'योद्धा' च्या संपूर्ण टीमने हजेरी लावली होती. या कार्यक्रमात दिशाने,जेव्हा ती मॉडेलिंग करत होती तेव्हा करणने तिला पाहिलं आणि अभिनेत्री म्हणून काम करण्याची संधी दिली, असा खुलासा केला.दिशा पाटनी म्हणाली, "मी आज अभिनेत्री आहे ती फक्त करण जोहरमुळे. कारण तोच होता ज्याने मला मॉडेलिंग करताना पाहिलं होतं आणि तेव्हा मी केवळ १८ वर्षांची होते. मला अजूनही असं वाटत जर करणने तेव्हा मला पाहिलं नसत तर मी आज या क्षेत्रात नसते. लोक करणबद्दल जे काही बोलतात त्याचा मला फरक पडत नाही. मी या इंडस्ट्रीमधली नाही म्हणून मला असं वाटतं की ही संधी मला करणमुळेच मिळाली आहे."दिशाच्या या विधानानंतर, करण तिला 'आय लव्ह यू' म्हणाला. या संभाषणात सिद्धार्थनेही भाग घेतला आणि त्यानेही करणचं कौतुक केलं. "असली हिरे की पेहेचान 'जोहर' को ही है," असं सिद्धार्थ म्हणाला.दरम्यान, दिशाच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'एम एस धोनी: द अनटोल्ड स्टोरी' या चित्रपटातून दिशाने हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. यासाठी तिला आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट अकादमीचा (IIFA) पुरस्कारही मिळाला होता. त्यानंतर दिशा 'बागी २', 'मलंग', 'एक विलन रिटर्न्स' यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसली होती. आता 'योद्धा'या आगामी चित्रपटात दिशा झळकणार आहे. हा चित्रपट १५ मार्च २०२४ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.या ॲक्शन चित्रपटाच्या ट्रेलर लाँचचा कार्यक्रम गुरुवारी आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये निर्माता करण जोहर, अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा, अभिनेत्री राशी खन्ना आणि दिशा पाटनी

## कर्करोगाशी झुंज देणाऱ्या हीनाने शेअर केले फोटो

मालिकाविश्वातून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री हीना खान सध्या कर्करोगाशी मोठी झुंज देत आहे. अभिनेत्रीला स्तनाचा कर्करोग झाला आहे. कर्करोग होऊनही हीना खचलेली नाही. ती सातत्याने उपचार घेत आहे. तसेच सोशल मीडियावर चाहत्यांना तिच्या प्रकृतीची प्रत्येक अपडेट देत आहे. आतादेखील तिने सोशल मीडियावर रुग्णालयातील काही फोटो पोस्ट केले आहेत.फोटोमध्ये दिसत आहे की, हीना रुग्णालयातील खोलीबाहेर असलेल्या जागेत चालत आहे. येथे ती कॅमेऱ्याकडे पाठ करून चालली आहे. अभिनेत्रीच्या हातात एक पाऊच बॅग आणि काही गोल आकाराच्या बाटल्या आहेत. त्यावरून ती किती वेदना सहन करत असेल याचा अंदाज येत आहे. हीनाला कर्करोगामुळे केमोथेरपीबरोबर अन्यही काही उपचार घ्यावे लागत आहेत. कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारावर मात करताना तिने याआधीही सोशल मीडियावर काही फोटो पोस्ट केले होते.आता हीनाने पोस्ट केलेल्या फोटोंना तिने, "उपचारांच्या या ठिकाणावरून उज्ज्वलतेकडे वाटचाल... एका वेळी एक पाऊल. आभार आभार आणि फक्त आभार, प्रार्थना", अशी कॅप्शन दिली आहे. अभिनेत्रीची अशी परिस्थिती पाहून आता चाहतेसुद्धा भावूक झालेत. अनेक चाहत्यांनी या फोटोवर कमेंट्स केल्यात. काहींनी पाणावलेल्या डोळ्यांचे इमोजी शेअर केले आहेत."असंच तुला कोणी शेर खान नाही म्हणत. आमच्या सर्वांची प्रार्थना तुझ्याबरोबर आहे.", "तू लवकर बरी होशील आणि तुला लवकर बरे व्हावे लागेल. आमच्या सर्वांच्या प्रार्थना तुझ्याबरोबर आहेत.", "तुला पाहून अनेक व्यक्ती जगणं शिकत आहेत", अशा अनेकविध कमेंट्स हीनाच्या या पोस्टवर आल्या आहेत.



## ऐश्वर्याने अभिषेक बच्चनबरोबर घेतला सेल्फी

मागील काही महिन्यांपासून अभिषेक बच्चन व ऐश्वर्या राय बच्चन यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चा होत आहे. दोघांच्या नात्यात सगळं आलबेल नसून त्यांनी 'ग्रे डिव्हॉर्स' घेतला आहे, असंही म्हटलं जात आहे. अभिषेक, ऐश्वर्या किंवा बच्चन कुटुंबातील कोणत्याही सदस्याने यावर प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, नेहमी ऐश्वर्या व अभिषेक एकाच इव्हेंटला वेगवेगळे येतात; त्यामुळे या चर्चांनी जोर धरला होता. अखेर या दोघांचा एक फोटो समोर आला आहे. अनंत अंबानी व राधिका मर्चंट यांच्या लग्नात अभिषेक व ऐश्वर्या वेगवेगळे पोहोचले होते. अभिषेक त्याचे आई-वडील व बहिणीच्या कुटुंबाबरोबर आला होता. तर, त्याच ठिकाणी ऐश्वर्या राय काही वेळाने लेक आराध्याबरोबर आली होती. त्यानंतर अनेकदा एका अवॉर्ड सोहळ्यात ऐश्वर्याबरोबर फक्त आराध्या दिसली होती. दोघांनी एकमेकांच्या वाढदिवसाला पोस्टदेखील केल्या नव्हत्या. त्यामुळे दोघांच्या नात्यात दुरावा आल्याची चर्चा जास्तच रंगली. आता प्रसिद्ध निर्माते शशी रंजन यांची पत्नी अनु रंजनने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट केली आहे.

# अन मोहम्मद सिराज संतापला!

## थेट चेंडूच मारला फेकून; सुदैवाने चेंडू मार्नस लबुशेन बचावला

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत ऑस्ट्रेलिया यांच्यातील गुलाबी चेंडूचा सामना ॲडलेड ओव्हलवर खेळवला जात आहे. या सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ संपला असून भारताकडे ९४ धावांची आघाडी आहे तर ऑस्ट्रेलियाने १ विकेट गमावत ८५ धावा केल्या आहेत. यादरम्यान भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि ऑस्ट्रेलियन फलंदाज मार्नस लबुशेन यांच्यात चांगलंच वातावरण तापले होते. मालिकेतील पहिल्या सामन्यातही या दोन्ही खेळाडूंमध्ये वाद झाल्याचे पाहायला मिळाले होते. मात्र यावेळी मोहम्मद सिराजने रागाच्या भरात चेंडू फेकला, सुदैवाने चेंडू मार्नस लबुशेनला लागला नाही.**




### सिराज चांगलाच वैतागला

कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्यादरम्यानही या दोन खेळाडूंमध्ये बाचाबाची झाली होती. ऑस्ट्रेलियाच्या डावातील २५व्या षटकात मोहम्मद सिराज गोलंदाजी करत होता, तर लबुशेनकडे स्ट्राईक होती. यादरम्यान दोन्ही खेळाडूंमध्ये चांगलीच बाचाबाची झालेली पाहायला मिळाली. या षटकातील चौथ्या चेंडूवर लबुशेन फलंदाजी करत होता, सिराज चेंडू टाकणार होता. सिराजने रनअप घेत अर्ध्या रस्त्यात पोहोचला होचा आणि तितक्यात लबुशेन विकेटपासून दूर गेला आणि त्याला थांबण्याचा इशारा केला. त्यामुळे सिराजला मध्येच गोलंदाजी थांबवावी लागली. यामुळे सिराज चांगलाच वैतागला.खरंतर साईड-स्क्रिनच्या इथून एक व्यक्ती काहीतरी सामना घेऊन बाहेर जात होता, त्यामुळे लबुशेनने चेंडू न खेळण्याचा निर्णय घेतला.

ऑस्ट्रेलियाच्या डावातील २५व्या षटकात मोहम्मद सिराज गोलंदाजी करत होता, तर लबुशेनकडे स्ट्राईक होती. यादरम्यान दोन्ही खेळाडूंमध्ये चांगलीच बाचाबाची झालेली पाहायला मिळाली. या षटकातील चौथ्या चेंडूवर लबुशेन फलंदाजी करत होता, सिराज चेंडू टाकणार होता. सिराजने रनअप घेत अर्ध्या रस्त्यात पोहोचला होचा आणि तितक्यात लबुशेन विकेटपासून दूर गेला आणि त्याला थांबण्याचा इशारा केला. त्यामुळे सिराजला मध्येच गोलंदाजी थांबवावी लागली. यामुळे सिराज चांगलाच वैतागला. खरंतर साईड-स्क्रिनच्या इथून एक व्यक्ती काहीतरी सामना घेऊन बाहेर जात होता, त्यामुळे लबुशेनने चेंडू न खेळण्याचा निर्णय घेतला. मात्र या घटनेनंतर सिराज चिडला आणि त्याने रागाने चेंडू लबुशेनच्या दिशेने फेकला. मात्र, चेंडू कुणालाही लागला नाही. चेंडू फेकल्यानंतर सिराज हातवारे करून त्याला काहीतरी बोलताना देखील दिसला. सोशल मीडियावर या घटनेचा व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्यादरम्यानही या दोन खेळाडूंमध्ये बाचाबाची झाली होती. ऑस्ट्रेलियन डावाच्या १३व्या षटकात मोहम्मद सिराज आणि मार्नस लबुशेन यांच्यात वाद झाला होता. सिराजने शॉर्ट लेन्थ बॉल टाकला होता, ज्याचा लबुशेनने बचाव केला होता. यानंतर सिराज चेंडू उचलण्यासाठी लबुशेनकडे गेला, तेव्हा लबुशेनने चेंडू बॅटने दूर ढकलला, त्यानंतर सिराज मैदानातच लॅबुशेनवर चिडला. यावेळी विराट कोहलीही लाबुशेनवर नाराज दिसत होता. डे नाईट कसोटीच्या पहिल्या दिवसाचा खेळ ऑस्ट्रेलियाच्या नावे राहिला. ऑस्ट्रेलियाने भारताला १८० धावसंख्येवर पहिल्याच दिवशी ऑल आऊट केलं. यानंतर ८५ धावांसह ऑस्ट्रेलिया चांगल्या स्थितीत आहे. भारतीय संघाला जर या कसोटीत पुनरागमन करायचे असेल तर संघाला दुसऱ्या दिवशी झटपट विकेट घ्यावे लागतील. ऑस्ट्रेलियाच्या डावातील २५व्या षटकात मोहम्मद सिराज गोलंदाजी करत होता, तर लबुशेनकडे स्ट्राईक होती. यादरम्यान दोन्ही खेळाडूंमध्ये चांगलीच बाचाबाची झालेली पाहायला मिळाली. या षटकातील चौथ्या चेंडूवर लबुशेन फलंदाजी करत होता, सिराज चेंडू टाकणार होता. सिराजने रनअप घेत अर्ध्या रस्त्यात पोहोचला होचा आणि तितक्यात लबुशेन विकेटपासून दूर गेला आणि त्याला थांबण्याचा इशारा केला. त्यामुळे सिराजला मध्येच गोलंदाजी थांबवावी लागली. यामुळे सिराज चांगलाच वैतागला.खरंतर साईड-स्क्रिनच्या इथून एक व्यक्ती काहीतरी सामना घेऊन बाहेर जात होता, त्यामुळे लबुशेनने चेंडू न खेळण्याचा निर्णय घेतला. मात्र या घटनेनंतर सिराज चिडला आणि त्याने रागाने चेंडू लबुशेनच्या दिशेने फेकला. मात्र, चेंडू कुणालाही लागला नाही. चेंडू फेकल्यानंतर सिराज हातवारे करून त्याला काहीतरी बोलताना देखील दिसला. सोशल मीडियावर या घटनेचा व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.

# बुमराहच्या भेदक गोलंदाजीची कमाल

## ‘ही’ कामगिरी करणारा जगातील पहिला वेगवान गोलंदाज

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत-ऑस्ट्रेलिया गुलाबी चेंडूच्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ संपला आहे. ऑस्ट्रेलियाने ८६ धावा केल्या असून १ विकेट गमावली आहे. यासह पहिल्या डावात १८० धावा केलेला भारतीय संघ अजूनही ९४ धावा पुढे आहे. भारताकडून जसप्रीत बुमराहने एक विकेट घेतली आहे. बुमराहने ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर उस्मान ख्वाजाला बाद करत एक मोठी कामगिरी आपल्या नावे केली आहे.**




### 50 कसोटी विकेट पूर्ण केले

एका वर्षात ५० अधिक विकेट घेण्याची कामगिरी केली होती. त्यांनी एका वर्षात ७४ विकेट मिळवले होते. हे वर्ष संपण्याआधी भारताचे दोन कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. त्यामुळे या सामन्यांमध्ये बुमराह किती विकेट्स मिळवतो यावर सर्वांच्या नजरा असणार आहेत.जसप्रीत बुमराहने २०२४ सालामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याने आपल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर अनेक सामने फिरवून भारताला विजय मिळवून दिला. पण यादरम्यानच बुमराहने कसोटी क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत या वर्षात आपले ५० कसोटी विकेट पूर्ण केले आहेत.

जसप्रीत बुमराहने २०२४ सालामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याने आपल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर अनेक सामने फिरवून भारताला विजय मिळवून दिला. पण यादरम्यानच बुमराहने कसोटी क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत या वर्षात आपले ५० कसोटी विकेट पूर्ण केले आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये २०२४ मध्ये ५० विकेट पूर्ण करणारा तो पहिला गोलंदाज आहे. बुमराहने भारत ऑस्ट्रेलिया मध्ये सुरू असलेल्या ॲडलेट कसोटीत उस्मान ख्वाजाला बाद करत ५० विकेटचा टप्पा गाठला आहे.भारतीय संघाच्या फारच कमी वेगवान गोलंदाजांनी एका वर्षात ५० विकेट्सचा टप्पा गाठला आहे. एका वर्षात ५० विकेट पूर्ण करणारा बुमराह हा तिसरा गोलंदाज ठरला आहे. याआधी ही कामगिरी फक्त कपिल देव आणि जहीर खान हे दोन वेगवान गोलंदाज करू शकले. आधी २०२ मध्ये जहीर खानने कसोटी क्रिकेटमध्ये ५१ विकेट एका वर्षात मिळवले होते. म्हणजेच तब्बल २२ वर्षांनंतर एखाद्या भारतीय गोलंदाजाने ५० विकेट घेण्याची कामगिरी केली आहे.